**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. १५३/२०२२**

**निशाणी १८ लगत आदेश**

(अंकुश वि. दगडु व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला ९ महिन्यांचा विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे वयस्कर व आजारी असून औषधोपचार घेत आहेत. प्रतिवादी क्र. ३ हे त्यांचेसोबत परगावी औषधोपचारासाठी जात असल्याने त्यांना कागदपत्रे घेवून वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे पतिवादी यांना कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी सदर विलंब जाणून बुजून केलेला नाही. सदरचा विलंब माफ न झालेस प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला ९ महिन्यांचा विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे अर्जावरती म्हणणे दाखल करण्यात आले असून त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी यांनी ब–याच मुदती घेतलेल्या असून ते मुद्दाम चालढकल करीत आहेत. अर्जात कायदेशीर कारण नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव व वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रत्येकी रु. २००/– दंड वादींना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वरीलप्रमाणे दंड भरल्यास प्रतिवादी यांना लेखी कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

सांगोला.
दिनांक – ०७/११/२०२३.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/11/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 07/11/2023 |